# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## नालंदा कुल

## संविधान दिन

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे मंगळवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी '**संविधान दिन**' मोठ्या उत्साहात आणि वैविध्यपूर्ण उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. हा दिवस भारतीय संविधान स्वीकारल्याच्या आठवणीसाठी समर्पित आहे. १९४९ रोजी याच दिवशी 'भारतीय संविधान' संविधान सभेने मंजूर केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले या होत्या. कार्यक्रमाचे आयोजन आणि मार्गदर्शन प्राध्यापिका बिजली दडपे यांनी केले.

सोमवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी निबंध लेखन व काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध लेखनाचा विषय ' भारतीय संविधान: नागरिकांची कर्तव्य आणि अधिकार ' हा होता, तर काव्यवाचन हे स्वरचित होते. मंगळवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भित्तिपत्रिका प्रदर्शन, भाषण स्पर्धा तसेच भारतीय सांस्कृतिक विविधतेवर आधारित नृत्ये, समूहगीतगायन आणि रमाबाई आंबेडकरांच्या मनोगतावर आधारित एकपात्री सादरीकरण असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाचा प्रारंभ सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाला. तत्पूर्वी प्रार्थना-परिपाठामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्राध्यापिका बिजली दडपे यांनी संविधानाचे महत्त्व व्यक्त करताना न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचे भारतीय नागरिकांसाठी महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिकूल परिस्थितीतील अनुभवांचा आढावा घेत संविधानाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचा समारोप वंदे मातरमने झाला. कार्यक्रमाचे आभार श्रीमती प्रशिका पवार यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कार्तिकी सोनटक्के आणि श्रीमती स्मितल कुरूप यांनी केले.




प्राचार्य डॉ. रमा भोसले संविधान दिनानिमित्त
निबंधलेखन हस्तलिखिताचे अनावरण करताना




बी.एड. प्रथम वर्ष छात्राध्यापक
स्वागतगीत सादर करताना







श्रीमती कार्तिकी सोनटक्के आणि नालंदा कुलप्रमुख श्रीमती स्मितल कुरूप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना







बी.एड. प्रथम वर्ष छात्राध्यापक संविधान दिन पर आधारित नृत्य सादर करताना




श्रीमती ऋणाली कचरे रमाबाई आंबेडकरांची भूमिका साकारताना




बी.एड. प्रथम वर्ष छात्राध्यापक निबंध लेखन करताना




कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्राध्यापिका बिजली दडपे संविधानाचे महत्त्व व्यक्त करताना




महाविद्यालयाच्या मा.प्राचार्य डॉ. रमा भोसले आपले मनोगत व्यक्त करताना